# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 31/12/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 04 कि.मी अंतरावर आजनी कोरडी शिवार येथे दिनांक 27/12/2020 चे 07.00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश मनरलाल कोरी, वय 28 वर्षे, रा. भितरी ता. पोलिस स्टेशन चुराड जि. सिंधी (म.प्र.) ह. मु. आजनी शेरडी भोजराज शामरावजी धुंदे यांचे शेतात हे कापुस वेचण्याकरिता बाहेर शेतात गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरामध्ये बॅगमध्ये ठेवलेले नगदी 15,000/–रू. व जिओ कंपनीचा मोबाईल कि. 500/–रु. असा एकुण कि. 15,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री राजेन्द्र यादव 9423602987 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. उमरेड :– दि. 15/03/2020 ते दि. 25/12/2020 चे दरम्यान 17 वर्षीय पीडित/फिर्यादी हिला आरोपी नामे– सचीन धतुरीया, वय 28 वर्ष, रा. कळमना, ता. उमरेड याने पीडितेच्या घरच्या लोकांना मारण्याची धमकी देउन पीडिता सोबत वेगवेगळया ठिकाणी वारंवार बळजबरीने शारीरिक संभोग करून पिडीताचा अश्लील व्हिडीओ तयार करून व्हॉटसॲप चे मार्फतीने पीडिताची बदनामी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन), 501, 506 भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम 67 माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. राजीव लोले 8080290801 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर